# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:16.07.2026** **वार:गुरुवार**

---

1. भारत-यूके सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार लागू; पहिल्याच दिवशी 14 कोटी डॉलर्स किमतीच्या मालाची पहिली खेप रवाना
2. सेमीकॉन प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला तसंच  मोबाइल फोन उत्पादन योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजूरी
3. आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारताची 3 सुवर्ण आणि 10 रौप्य पदकांची कमाई आणि
4. फिफा फुटबॉल विश्व चषक स्पर्धेत इंग्लंडला हरवून अर्जेंटिनाचा अंतिम फेरीत प्रवेश

**भारत-युनायटेड किंगडम करार**

भारत आणि युनायटेड किंगडम यांच्यातील सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार कालपासून अंमलात आला. या महत्त्वाच्या करारामुळे भारतातून यूकेमध्ये होणाऱ्या 99 टक्के निर्यातीवर कोणतीही शुल्क आकारणी केली जाणार नाही. जागतिक स्तरावर एकात्मिक, लवचिक आणि स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेकडे होणाऱ्या वाटचालीतील हा एक मोठा टप्पा मानला जात आहे. कराराच्या पहिल्या दिवशी, भारतातून युके मध्ये 14 कोटी डॉलर्स किमतीच्या मालाची खेप मुंबईतील न्हावाशेवा इथून रवाना करण्यात आली. औषध निर्माण सामग्री, रसायनं, प्लास्टिक, खाद्यपदार्थ, एन्झाइन्म्स आणि मसाले अशा प्रकारच्या 7 निर्यातदारांचा माल त्यातून पाठवण्यात आला.

या व्यापार कराराचा औपचारिक शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल मुंबईत करण्यात आला. हा करार जागतिक बाजारपेठेत भारताच्या वाढत्या आर्थिक सामर्थ्याचं प्रतिबिंब असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. विकसित भारताच्या प्रवासातील हा एक निर्णायक टप्पा असल्याचं त्यांनी नमूद केलं.

भारत-यूके द्विपक्षीय व्यापार 100 अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्यासाठी हा करार महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास ब्रिटिश उपवाणिज्यदूत हरजिंदर कांग यांनी यावेळी व्यक्त केला. या कार्यक्रमाला ब्रिटिश वाणिज्य दूतावासाचे अधिकारी, निर्यातदार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

हा करार हा भारत आणि युके यांच्या भागीदारीतील एक महत्वाचा क्षण आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. तर हा करार व्यापार, गुंतवणूक आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी संधींची नवीन दारं खुली करेल असा विश्वास केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त केला.

देशातल्या विविध उद्योग संघटनांनीही या कराराचं स्वागत केलं आहे.

**सेमीकॉन**

देशात सेमिकंडक्टर निर्मितीसाठी 'सेमीकॉन योजनेच्या दुसऱ्या टप्प्याला केंद्रीय मंत्रीमंडळानं मंजुरी दिली आहे. यासाठी 1 लाख 27 हजार 500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सेमीकॉन योजनेच्या पहिल्या टप्प्याच्या यशाची गती कायम राखत दुसऱ्या टप्प्यात आर्थिक विकास आणि पुरवठा साखळीला मजबुती देण्यावर या टप्प्यात भर दिला जाईल. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मंत्रिमंडळानं 62 हजार 500 कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीसह 'मोबाईल फोन उत्पादन योजने'लाही मंजुरी दिली आहे.

पुढील पाच वर्ष सुरू राहणाऱ्या या योजनेमुळे जवळपास 60 हजार प्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. यामुळे एकंदर निर्यातीचं मूल्य साडे 7 लाख कोटी रुपयांवरून 15 लाख कोटी रुपयांवर जाण्याची शक्यता असल्याचंही ते म्हणाले.

**राष्ट्रपती मुर्मू**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत 'सौश्रुतम् 2026' या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचं उद्घाटन झालं. अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेनं हे तीन दिवसीय चर्चासत्र आयोजित केलं आहे. आयुर्वेद आणि आधुनिक शस्त्रक्रिया क्षेत्रातील संशोधन आणि सहकार्याला या चर्चासत्रामुळे नवी दिशा मिळेल. आचार्य सुश्रुत यांच्या सन्मानार्थ दरवर्षी 15 जुलै रोजी अशा प्रकारच्या चर्चासत्राचं आयोजन करण्यात येतं.

**पंतप्रधान दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या हरियाणा, चंदीगड आणि पंजाबचा दौरा करणार आहेत. हरियाणातल्या जिंद रेल्वे स्थानकावरून जिंद आणि सोनीपत दरम्यान धावणाऱ्या भारताच्या पहिल्या हायड्रोजन रेल्वेला पंतप्रधान हिरवा झेंडा दाखवतील. तसंच सुमारे 14 हजार 700 कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांची पायाभरणी करतील.

**अमेरिका-इराण**

अमेरिकेच्या लष्कराने इराणवर पुन्हा हल्ले सुरू केल्याचं जाहीर केलं आहे. इराणच्या सरकारी प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, इराणचा एकमेव नागरी अणुऊर्जा प्रकल्प असलेल्या बुशेहर या दक्षिण बंदराच्या शहरावर अमेरिकेनं हल्ले केले. लष्करी क्षमता कमकुवत करण्याच्या उद्देशाने हे हल्ले करण्यात आले आहेत असं अमेरिकेच्या लष्करी मुख्यालयानं सांगितलं. दुसरीकडे, इराणनं, बहारीन आणि जॉर्डनमधील अमेरिकी लष्करी तळ, हवाई दलाचे तळ, प्रमुख नियंत्रण केंद्र यावर प्रत्युत्तरादाखल हल्ले केले आहेत असं इराणच्या 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड्स कॉर्प्स'नं म्हटलं आहे.

**जयशंकर**

भारत आणि बेल्जियम यांनी व्यापार, गुंतवणूक, हरित ऊर्जा, नवोपक्रम, तंत्रज्ञान, संपर्क यंत्रणा, संरक्षण, सुरक्षा, तसंच परस्पर जनसंपर्क यांसारख्या क्षेत्रात उभय देशांमधील सहकार्य दृढ करण्यास सहमती दर्शविली आहे. भारत-बेल्जियम धोरणात्मक संवाद सत्राची पहिली बैठक काल ब्रुसेल्स इथं झाली त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस.जयशंकर आणि बेल्जियमचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री मॅक्सिम प्रेव्होट यांच्या प्रमुख उपस्थितीत हे संवाद सत्र झालं. दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध बळकट करण्याच्या दिशेनं हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे असं डॉक्टर जयशंकर म्हणाले.

**आंतरराष्ट्रीय विमान सेवा**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अबूधाबीसाठी पहिली आंतरराष्ट्रीय विमान सेवा कालपासून सुरू झाली. नवी मुंबई विमानतळावरून पहिल्यांदाच नाशवंत वस्तूंची निर्यातही करण्यात आली. गेल्या वर्षी 25 डिसेंबरला सुरू झालेल्या या विमानतळानं अवघ्या सात महिन्यांत आतापर्यंत 23 लाखांहून अधिक प्रवाशांना 46 ठिकाणी देशांतर्गत प्रवास करण्यासाठी सेवा दिली आहे.

मध्य प्रदेशातूनही पहिली आंतरराष्ट्रीय विमानसेवा काल सुरू करण्यात आली. इंदूर ते अबुधाबी हा प्रवास आता अवघ्या तीन तास पंधरा मिनिटांत होणार आहे. यापूर्वी प्रवाशांना दिल्ली किंवा मुंबईमार्गे प्रवास करावा लागत होता.

**पुरी यात्रा**

ओडिशामधील जगन्नाथपुरी इथं आजपासून जगप्रसिद्ध रथयात्रा सुरू झाली आहे. या वार्षिक उत्सवादरम्यान, भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा रथातून भाविकांना दर्शन देतात आणि गुंडिचा मंदिराला भेट देतात. पुरी मंदिरापासून सुरू होणारी ही यात्रा सुमारे 3 किलोमीटर वर असलेल्या श्री गुंडिचा मंदिराजवळ संपेल. गुंडिचा मंदिरात देव नऊ दिवस मुक्काम करतात आणि त्यानंतर याच रथांतून श्री मंदिरात परततात; या परतीच्या प्रवासाला 'बहुडा यात्रा' असं म्हटलं जातं.

**हेरंब करमरकर मृत्यू**

होर्मुज सामुद्रधुनीतील ओमानच्या किनाऱ्याजवळ जीएफएक्स गॅलेक्सी या व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्यानंतर बेपत्ता असलेले पुण्याचे 30 वर्षीय सागरी अभियंता हेरंब करमरकर यांचा मृत्यू झाला आहे. ओमान नौदलाच्या ताब्यात असलेला त्यांचा मृतदेह लवकरात लवकर मायदेशी आणण्यासाठी प्रशासन आणि त्यांचे कुटुंबीय प्रयत्न करत आहेत. हेरंब हे गेल्या पाच महिन्यांपासून या जहाजावर कार्यरत होते.

**क्रिकेट**

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये, भारत आणि इंग्लंड यांच्यातील तीन सामन्यांच्या मालिकेतील दुसरा एकदिवसीय सामना आज कार्डिफमधील सोफिया गार्डन्स इथं होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी साडेपाच वाजता सुरू होईल. या मालिकेत भारत 1-0 नं आघाडीवर आहे. तिसरा सामना येत्या रविवारी लंडनच्या लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर होणार आहे.

**आशियाई मुष्टियुद्ध**

जकार्ता इथं सुरू असलेल्या 19 आणि 23 वर्षांखालील आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारतीय महिला मुष्टियोद्ध्यांनी 3 सुवर्ण आणि 10 रौप्य पदकांची कमाई केली. 19 वर्षांखालील चंद्रीका पुजारी आणि प्राची यांनी आपापल्या वजनी गटात सुवर्णपदक मिळवलं तर गुंजन, जॉयश्री, चाहत, अंशिका, मेघा श्योकंद आणि प्राची तोकस यांना रौप्य पदकं मिळाली. 23 वर्षांखालील 54 किलो वजनी गटात निशाला सुवर्ण तर नितिका चंद, काजल, मुस्कान आणि प्रियांका यांना आपापल्या वजनी गटात रौप्य पदकं मिळाली.

**फिफा**

फिफा फुटबॉल विश्वचषकाच्या गतविजेत्या अर्जेंटिनाने इंग्लंडचा 2-1 असा पराभव करून अंतिम सामन्यात प्रवेश केला आहे. 55 व्या मिनिटाला अँथनी गॉर्डनने इंग्लंडसाठी पहिला गोल केला. अर्जेंटिनाच्या एन्झो फर्नांडिसने 85 व्या मिनिटाला बरोबरी साधली त्यानंतर 90 व्या मिनिटाला लाउटारो मार्टिनेझनं गोल करत अर्जेंटिनाला 2-1 असा विजय मिळवून दिला. अंतिम सामना अर्जेंटिना आणि स्पेन यांच्यात येत्या रविवारी 19 जुलै रोजी होणार आहे.

**हवामान**

हवामान विभागानं आज अरुणाचल प्रदेश, पश्चिम बंगालचा काही भाग आणि ओडिशा येथील काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे तसंच आसाम, मेघालय, बिहारसह उत्तराखंडमध्येही आज मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आंध्र प्रदेश, तामिळनाडू, पुद्दुचेरीच्या काही भागांत आज उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

# या बरोबरच ही राष्ट्रीय बातमीपत्र संपल,

# नमस्कार.